# शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे विचारधन

भारताच्या सर्वच राज्यात नसेल कदाचित परंतु, (जुन्या) मध्यप्रदेशात तरी उच्च ध्येयाने एकत्र आलेले एवढे विशाल कुटूंब दुसरे नाही. या कुटूंबाच्या कार्याची दखल घेतली जावी व त्याचे योग्य मूल्यमापन करून सहानुभूतीने त्याजकडे जनतेने व जबाबदार लोकांनी बघावे अशी मला एकसारखी उत्कंठा लागली आहे. त्याचप्रमाणे या हजारो कुटूंब घटकांनाही मी कळकळीने सांगू इच्छितो की त्यांनी ध्येयाची एकवाच्यता, स्वंयस्फूर्त शिस्त, शौर्याची वृत्ती, धाडस, सत्याची व प्रामाणिकपणाची चाड हे गुण आपल्या अंगी आणून संकूचितवृत्तीचा पूर्णपणे त्याग करावा. या शब्दाची नुसती पोपटपंची करून चालणार नाही. त्याची प्रत्यक्ष आचरणात सत्यता उतरली पाहिजे. आपल्या सर्व संस्थातील प्रत्येक अध्यापकाने व प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या वर्तनाने, शिस्तप्रियतेने, विनयशिलतेने इतराहून आपला निराळेपणा दाखवून दिला पाहिजे व आपण श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या या थोर कुटूंबाचे घटक आहोत हे तोंडाने न सांगताही इतरांना ओळखू येईल असे आपले आचरण ठेवले पाहिजे.

## श्री शिवाजी शिक्षण 'संस्थागीत'

# 'हो तेजोमय अंबर हे !'

विद्येची हो जिथे साधना त्या विद्येचे मंदिर हे
कण कण इथला हो ज्योतिर्मय, हो तेजोमय अंबर हे !

निष्ठेचे हो जेथे पूजन
ओंकाराचे तिथेच दर्शन
सृजनाचा उद्घोष सांगतो...दीप अम्ही, तर भास्कर हे !

सकलांना या ज्ञान मिळू दे !
सकलांचा सन्मान फळू दे !
प्रगतीला ने शिखरावरती नव्यायुगाचे अक्षर हे !

एक महर्षी बीज पेरतो
समृद्धीचा मार्ग दावितो
त्या वृक्षाची फळे चाखती अवघे लोक निरंतर हे !

माणुसकी हा धर्म येथला
त्यासाठी हा जन्म घेतला
या जगण्याचे सार्थक व्हाया विश्व करू या सुंदर हे !

हो तेजोमय अंबर हे !

■ अरुण सांगोळे